# पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण
पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३.२३०९७००
E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


**प्रेस नोट** दिनांक : १९/०९/२०२४

**स्थानिक गुन्हे शाखा, नाशिक ग्रामीण पोलीसांची कामगिरी ०४ जबरी चोरी, ०१ घरफोडी व ०४ शेतक-याच्या पाण्याचे मोटर चोरी प्रकरणात एकुण १० आरोपी अग्नीशस्त्र व धारदार हत्यार व गुन्ह्यात वापरलेल्या ०३ मोटर सायकलसह जेरबंद**

---

वडनेर खाकुर्डी पोलीस ठाणे हद्दीत रावळगाव या ठिकाणी एच. पी. पेट्रोलपंपावरील जमा असलेली रोख रक्कमेचा बँकेत भरणा करणेकामी जात असतांना फिर्यादीस अडवुन कोयत्याचा धाक दाखवुन रोख रुपये 5,34,700/- जबरी चोरी प्रकरणी गुरनं. 106/2023 कलम 394, 341, 34 भांद.वि. तसेच सन 2024 मध्ये सुध्दा अशाचप्रकारे रोख रुपये 6,59,430/- जबरी चोरी प्रकरणी गुरनं. 233/2024 कलम 392, 341, 34 भा.दं.वि. अन्वये वडनेर खाकुर्डी पोलीस ठाणेस गुन्हे दाखल आहेत. त्याच बरोबर मागील तीन ते चार महिन्यापुर्वी भायगांव शिवारात ग्रामीण भागातील महिला बचत गटाचे पैसे गोळा करुन बँकेत भरणा करण्याकरिता जात असलेल्या फिर्यादीस वेगवेगळ्या अज्ञात तीन ते चार आरोपीतांनी मोटर सायकलवर पाठलाग करुन त्यांना रस्त्यात अडवुन कोयत्याचा धाक दाखवुन त्यांचे ताब्यातुन रुपये 64,818/- रक्कम असलेली बॅग बळजबरीने चोरी केले बाबत गुरनं. 305/2024 कलम 304 (२), भा.न्या. सं. अशाचप्रकारे कुकाणे परिसरातील अन्य गुन्ह्यात रोख रुपये 55,600/- असलेली बॅग जबरी चोरी प्रकरणी वडनेर खाकुर्डी पोलीस ठाणेस गुरनं. 333/2024 कलम 304(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हे दाखल आहेत. त्याच बरोबर वडगांव शिवारात घरफोडी बाबत गुरनं. 39/2024 कलम 457, 380 भा.दं.वि. अन्वये घरफोडी करुन रुपये 71,500/- चा ऐवज चोरी केलेबाबत गुन्हा दाखल आहे. तसेच स्थानिक शेतक-याच्या शेती करिता लावलेल्या पाण्याच्या मोटारी चोरीस गेलेबाबत अनेक घटना घडलेल्या आहेत.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक, मालेगांव श्री अनिकेत भारती, उपविभागीय पोलीस अधिकारी,श्री नितीन गणापुरे यांनी वरिल घटनांचे अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा, नाशिक ग्रामीण यांना गुन्हे उघडकीस आणणेसाठी सुचना दिल्या होत्या.

त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री राजु सुर्वे, पोउनि. दत्ता कांभिरे व पथक यांनी केलेल्या समांतर तपासात गुन्ह्यातील आरोपींची गुन्हा करण्याची पध्दत, गुन्ह्यातील साक्षीदारांनी आरोपीचे सांगितलेले वर्णन व त्यांची बोलीभाषा यावरुन स्थागुशाचे पोलीस निरीक्षक राजु सुर्वे व त्यांचे पथक यांनी गोपनीय माहिती काढुन सदरचे गुन्हे सराईत गुन्हेगार महेंद्र मधुकर सोनवणे रा, काष्टी ता. मालेगांव, जि.नाशिक व विशाल सुभाष पवार रा. सेक्शन बी मालेगांव याने त्याचे वेगवेगळ्या साथीदारांसह मिळुन केलेले असल्याची खात्रीशीर मिळालेल्या बातमीवरुन त्यांना सुरुवातीस अग्नीशस्त्रासह ताब्यात घेवुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने काष्टी, कुकाणे ता. मालेगांव व मालेगांव कॅम्प, पंचशिलनगर, जाजुवाडी या परिसरातुन खालील आरोपीतांना ताब्यात घेतले आहे.

१) महेंद्र मधुकर सोनवणे, वय 22 वर्षे, रा. काष्टी ता. मालेगांव, (कुकाणे व भायगांव शिवार बॅग लिप्टींग व घरफोडी )
२) दिनेश उर्फ डेविल नंदु पवार, वय 20 वर्षे, रा. मालेगांव कॅम्प, सिंधी कलनी, (रावळगांव पेट्रोलपंप, भायगांव शिवार बॅग लिप्टींग व घरफोडी)
३) विशाल सुभाष पवार, वय 20 वर्षे, रा. पाचडिव्हीजन, सेक्शन बी, ता. मालेगांव (रावळगांव पेट्रोलपंप, कुकाणे व भायगांव शिवार बॅग लिप्टींग )
४) तुषार उर्फ काळ्या आप्पा मोहिते, वय 19 रा. पंचशीलनगर, मालेगांव कॅम्प, (कुकाणे बॅग लिप्टींग )

५) अक्षय मधुकर खरे, वय 23, रा. पंचशिलनगर, मालेगांव कॅम्प, (कुकाणे बॅग लिप्टींग )
६) अरुण दत्तु सोनवणे, वय 24 रा. कुकाणे ता. मालेगांव (कुकाणे बॅग लिप्टींग )
७) दिपक धर्मराज गुजरे, वय 21, रा. जाजुवाडी हनुमान मंदिराजवळ, मालेगांव ( रावळगांव पेट्रोलपंप )
८) अनिकेत कनैय्या गवळी, वय 22 रा. मालेगांव कॅम्प, श्रीकृष्णनगर, ( रावळगांव पेट्रोलपंप )
९) जितु आखाडे पवार, वय 19, रा. कुकाणे ता. मालेगांव (कुकाणे बॅग लिप्टींग )
१०) राहुल संजय खैरनार, वय 23 रा. काष्टी ता. मालेगांव (कुकाणे बॅग लिप्टींग )

सदर आरोपीतांना वरिल गुन्ह्याचे तपासात चौकशी केली असता महेंद्र मधुकर सोनवणे रा. काष्टी याने त्याचे साथीदार यांचेसह महिला बचत गटाचे पैसै जमा करणारे इसम यांचा मोटर सायकलवर कुकाणे, भायगांव परिसरातुन पाठलाग करुन त्यांना कोयत्याचा धाक दाखवुन त्यांचेकडुन बळजबरीने बॅगमधील रोख रक्कम हिसकावुन घेवुन पळुन गेले असल्याची कबुली दिली आहे. तसेच दिपक धर्मराज गुजरे, अनिकेत गवळी, विशाल पवार, दिनेश पवार यांनी रावळगांव परिसरातुन पेट्रोलपंपाचे पैसे भरणार करणारे इसमाचा पाठलाग करुन त्यास कोयत्याचा धाक दाखवुन रोख रक्कम बळजबरीने हिसकावुन घेतली असल्याची कबुली दिली आहे. तसेच शेतक-यांच्या पाण्याच्या मोटारी चोरी प्रकरणी अरुण सोनवणे याने कबुली दिली आहे.

आरोपी नामे विशाल पवार याचे कब्जातुन त्याने विनापरवाना जवळ बाळगलेला एक गावठी पिस्टल, दोन जिवंत काडतुसे (राऊंड) व एक धारदार तलवार व कोयता हस्तगत करण्यात आला आहे. असुन त्याचेविरुध्द भा.ह.का. अन्वये स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच दिनेश पवार व जितु पवार याचेकडुन त्याने गुन्ह्यात वापरलेला एक धारदार कोयता व एक खंजीर हस्तगत करण्यात आला. तसेच वरिल गुन्हा करण्यासाठी आरोपीताने वापरलेल्या ०३ मोटर सायकल व ०६ मोबाईल फोन जप्त करण्यात आलेले आहेत.

यामधील आरोपीत नामे विशाल पवार याचे विरुध्द यापुर्वी ०२ मारामारीचे, महेंद्र सोनवणे याचेविरुध्द ०२ जबरी चोरी व एक विनयभंग व पोक्सो तसेच दिनेश उर्फ डेविल पवार याचेविरुध्द जबरी चोरीचा ०१ व राहुल खैरनार याचे विरुध्द ०२ मारामारीचे गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपीतांना पुढील तपासकामी वडनेर खाकुर्डी पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे. वरिल सर्व आरोपीतांकडुन आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक, मालेगांव श्री अनिकेत भारती व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री नितीन गणापुरे यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री राजु सुर्वे, पोलीस उपनिरीक्षक, श्री दत्ता कांभिरे, स्थागुशाचे पोलीस अंमलदार पो.हवा.गिरीष निकुंभ, सुभाष चोपडा, शरद मोगल, पो.ना. नरेंद्रकुमार कोळी, योगेश कोळी, तांत्रिक विश्लेषण शाखेचे पो.हवा.हेमंत गिलबिले, प्रदीप बहिरम तसेच वडनेर खाकुर्डी पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक शिशीरकुमार देशमुख, पोलीस उपनिरीक्षक, श्री नवले, पो.अंम. गजानन कासार यांचे पथकाने वरिल जबरी चोरीचे ०४ गुन्हे व घरफोडीचा ०१ व पाण्याची मोटर चोरीचे ०४ गुन्हे उघडकीस आणुन गुन्ह्यातील आरोपीताकडुन ०१ अग्नीशस्त्र, ०२ जिवंत काडतुस, ०१ तलवार, ०२ कोयते, ०१ खंजीर, ०३ मोटर सायकल, ०६ मोबाईल फोन असा मुद्देमाल जप्त केलेला आहे.